# ऑनलाईन वाचन संस्कृती बहरतेय

## तरुणाईत ट्रेंड ; प्रसिद्ध लेखकांच्या साहित्यासह नवोदितांच्या पुस्तकांनाही मागणी

नंदिनी नरेवाडी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २१ : आधुनिक जीवनशैलीमध्ये पारंपरिक गोष्टीत बदल होऊन तिचे नवीन रूप समोर येते. तसेच काहीसे पुस्तकांच्या बाबतीतही झाले आहे. 'ई बुक' हे पुस्तकांचे आधुनिक रूप आजच्या तरुणाईला आणि 'टेक्नोसॅव्ही' मंडळींना खुणावत असून, त्यामुळे ऑनलाईन पद्धतीची वाचन संस्कृती बहरत असल्याचे दिसून येते. आजचा दिवस हा जगप्रसिद्ध साहित्यिक शेक्सपिअर यांचा स्मृतीदिन जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो.**

त्यानिमित्ताने वाचन संस्कृतीचा आढावा घेतला असता ऑनलाईन पुस्तके वाचणे तरुणाईला भावत असल्याचे दिसून आले. त्याचा परिणाम सकारात्मक असून ज्येष्ठांसोबतच तरुणाईही वाचनाचा छंद जपत असल्याचे या क्षेत्रातील मंडळींनी सांगितले. व्हॉटस्‌ॲप, फेसबुक आणि समाजमाध्यमांच्या उपलब्धतेनंतर वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे, अशी ओरड होताना दिसते. मात्र असे प्रत्यक्षात होत नसुन फक्त वाचनाची पद्धत, माध्यम आणि जागा बदलत आहे.



सुरवातीला दिवाळी अंकात कथा, कविता, वैचारिक लिखाण करणारे नवोदित लेखकांची संख्याही अधिक आहे. अशा दर्जेदार लिखाण करणाऱ्या नवोदित लेखकांचे पुस्तके प्रकाशन करून प्रकाशन संस्था त्यांना प्रोत्साहनही देताना दिसतात. प्रिंटसोबत त्यांची ई बुक्स व ऑडिओ बुक्सही तयार केल्या जातात. शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या पोर्टलला दरदिवशी भेट देणाऱ्या वाचक, विद्यार्थ्यांची संख्या सहाशे ते सातशे आहे. शासनाच्या नॅशनल डिजिटल लायब्ररीलाही भेट देऊन आवडते पुस्तक वाचणाऱ्या वाचकांची संख्याही मोठी आहे.

### किंमत कमी, डिजिटलला संधी

प्रिंट केलेल्या पुस्तकापेक्षा ई बुक्सची किंमत कमी आहे. अभियांत्रिकी तसेच अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांची ई बुक्स उपलब्ध आहेत. त्यामुळे मोबाईल, लॅपटॉपवर सहज उपलब्ध असलेल्या या पुस्तकांना विद्यार्थ्यांसह शिक्षक, वाचकांचीही पसंती मिळत आहे.

### अन्यथा कारवाई होऊ श

सध्या गाजलेल्या पुस्तकांच्या पीडीएफ व्हॉटस्‌ॲप व सोशल मिडीयावरून फॉरवर्ड होताना दिसतात. मात्र या पुस्तकांचे कॉपीराईट आहे का ? हे तपासले जात नाही. अशी पुस्तके न वाचता किंडलसारख्या ई बुक्स उपलब्ध करून देणाऱ्या पोर्टलवरून सब्सक्राईब केल्या पाहिजेत. अन्यथा सायबर गुन्हेगारी अंतर्गत कारवाईही होऊ शकते.

**» जागतिक पुस्तक आणि कॉपीराईट दिवस विशेष**

> **सध्या जे नवोदित लेखक सकस लिहितात त्यांचे हस्तलिखित पाहून पुस्तक प्रकाशित केले जाते. आमच्याकडे सध्या बाराशे ई बुक्स आहेत. त्यांनाही मागणी आहे. प्रिंट पुस्तके वाचण्याची ज्यांना सवय आहे ते पुस्तके विकत घेतात. मात्र, ज्यांना कमी किमतीत व स्मार्ट फोन उपलब्ध आहे ते ई बुक्स वाचण्यावर भर देतात. एकूणच वाचनसंख्या वाढल्याचे दिसते.**
>
> **- अनिल मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस

> **वाचन संस्कृती दिवसेंदिवस बहरताना दिसते. प्रिंट माध्यम थोड्या प्रमाणात कमी झाले असले तरी त्यांचा वाचकवर्ग टिकून आहे. ऑनलाईन वाचकसंख्याही मोठी आहे. जुन्या व प्रसिद्ध लेखकांच्या साहित्यासोबतच नवोदित लेखकांच्या पुस्तकांनाही मागणी आहे.**
>
> **- डॉ. नमिता खोत,** संचालिका, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस

लोकमत

# महापालिका क्षेत्रात सर्वाधिक अलगीकरण

## ४५४ जण : जिल्हा प्रशासन शिवाजी विद्यापीठ, 'केआयटी'चे वसतिगृह ताब्यात घेणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील ४२ ठिकाणी एकूण ९९२ व्यक्तींचे संस्थात्मक अलगीकरण (इन्स्टिट्यूशनल क्वॉरंटाईन) करण्यात आले आहे. त्यात सर्वाधिक ४५४ जण महानगरपालिकेच्या हद्दीत आहेत. गेल्या महिन्याभरापासून अलगीकरण सुरु केले आहे. अलगीकरण केलेल्या व्यक्तींना निवासाच्या व्यवस्थेसह दोनवेळा नाष्टा, जेवणाची सुविधा पुरविण्यात येत आहे.

जिल्ह्यात दि. २५ मार्चपासून संस्थात्मक अलगीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने महानगरपालिका आणि अकरा तालुक्यांतील विविध महाविद्यालये, शाळांसह शासकीय इमारती ताब्यात घेऊन त्याठिकाणी अलगीकरण कक्ष सुरु केला आहे. तेथील क्षमता २८१२ व्यक्तींची असून, सध्या त्याठिकाणी एकूण ९९२ जणांचे अलगीकरण केले आहे.

त्यामध्ये कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांसह राजस्थान, तमिळनाडू, आदी राज्यांतील व्यक्तींचा समावेश आहे. या व्यक्तींना दोनवेळ नाष्टा, जेवण दिले जाते. आंघोळीसाठी गरम पाणी देण्यात येते.

आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. कोरोनाबाबतची दक्षता म्हणून अलगीकरणाची क्षमता वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने न्यू कॉलेजची इमारत ताब्यात घेतली आहे.

शिवाजी विद्यापीठातील मुलांची तिन्ही वसतिगृहे, केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे वसतिगृह लवकरच ताब्यात घेतली जाणार आहेत.




कोल्हापुरातील शेंडा पार्क येथील कुटुंब कल्याण केंद्रातील अधिकारी वसतिगृहात क्वारंटाईन वॉर्ड सुरु करण्यात आला

### महापालिका क्षेत्रात १४ ठिकाणी व्यवस्था

महापालिका क्षेत्रातील शेंडा पार्क येथील कर्मचारी निवासस्थानांची इमारत, कुटुंब कल्याण केंद्र आणि प्रशिक्षणार्थींचे वसतिगृह, विचारेमाळ येथील डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची इमारत, शासकीय तंत्रनिकेतन मुलांचे वसतिगृह, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह, राजाराम महाविद्यालय आणि कृषी महाविद्यालयातील मुलांचे वसतिगृह, न्यू कॉलेज, विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग, आर्मी लेडिज हॉस्टेल (लाईनबाजार) याठिकाणी अलगीकरणाचा कक्ष सुरु आहे.

"शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाच्या एका वसतिगृहात कोविड केअर सेंटर तयार केले आहे. आणखी एक सेंटर केले जाणार आहे. पुढील नियोजनासाठी विद्यापीठातील अन्य तीन, न्यू कॉलेज आणि केआयटी कॉलेजची वसतिगृहे ताब्यात घेतली जाणार आहेत. शहरातील काही बोर्डिंगचीही प्रशासनाने पाहणी केली आहे.

**- संभाजी माने,**
समन्वयक, संस्थात्मक अलगीकरण विभाग

# विद्यापीठीय परीक्षा ऑनलाईन नको

## ए.आय.एस.एफ.ची शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

कोल्हापूर, ता. २२ : ग्रामीण भागामध्ये इंटरनेट सुविधा सर्वत्र नाही. विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देण्याचा अनुभव नाही. अभ्यासक्रम आणि अध्यापनही ऑनलाईन परीक्षेला पूरक नाही. त्यामुळे विद्यापीठ परीक्षा ऑनलाईन पद्धतीने न घेता नेहमी प्रमाणेच घ्याव्यात, अशी मागणी ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनतर्फे करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांना दिले.

निवेदनात दिलेल्या माहितीनुसार, कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालये बंद ठेवण्यात आली. त्यामुळे विद्यापीठीय परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. या परीक्षा कशा आणि कधी घ्याव्यात यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील ७ कुलगुरूंची एक समिती नेमली आहे. या समितीच्या अहवालानंतर परीक्षेचे स्वरुप ठरेल. मात्र या परीक्षा ऑनलाइन होणार असल्याची चर्चा आहे. मात्र या परीक्षा ऑनलाईन घेऊ नयेत. कारण ग्रामीण भागात इंटरनेट सार्वत्रिक नाही. विद्यार्थी ऑनलाईन यंत्रणेबाबत अनभिज्ञ आहेत. अभ्यासक्रम आणि अध्यापन हे देखील ऑनलाईन परीक्षेसाठी पूरक नाहीत. त्यामुळे ऑनलाईन परीक्षा घेऊ नयेत. हे निवेदन ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री सामंत यांना दिले.

# विद्यापीठातर्फे 'कोविड -१९' प्रश्नमंजूषा स्पर्धा

कोल्हापूर: कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभर लॉकडाऊन सुरू आहे. लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये सामाजिक जबाबदारी म्हणून शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना आणि शिव सहाय्यता आपत्ती व्यवस्थापनच्या वतीने 'कोविड-१९" जनजागृती प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत लिंकवर प्रश्नावली टाकण्यात येणार आहे. ऑनलाईन प्रश्नावली सोडवल्यानंतर स्पर्धकांना प्राप्त झालेले गुण लिंकवर पाहता येतील. तसेच ई-मेलव्दारे प्रमाणपत्रही पाठवणार आहे. तरी जास्तीत जास्त स्पर्धकांनी कोविड-१९ प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

तरुण भारत Thu, 23 April 202
https://epaper.ta

# कोरोनासंदर्भात आज ऑनलाईन प्रशिक्षण

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि युनिसेफ यांच्या वतीने गुरुवारी (दि. २३) कोरोना दक्षतेबाबत ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ ते ५ या कालावधीत हे प्रशिक्षण होणार आहे. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये यांनी ही माहिती दिली. इच्छुकांनी युट्यूबवर https://youtube/zFrQ73nHHYI या लिंकवर तीन वाजता ऑनलाईन उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

Kolhapur Edition
23 Apr, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# विद्यापीठ वसतिगृहांतील साहित्याचे स्थलांतरण

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आयसोलेशन रुग्णालय-कक्ष उभारण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने शिवाजी विद्यापीठातील मुलांची तिन्ही वसतिगृहे ताब्यात घेतली जाणार आहेत. त्यासाठी या वसतिगृहांमध्ये असलेल्या साहित्याच्या स्थलांतरणाची प्रक्रिया आज, गुरुवारपासून सुरु होणार आहे.

या तिन्ही वसतिगृहांमध्ये एकूण ६१५ खोल्या आहेत. सध्या त्याठिकाणी विद्यार्थी राहत नाहीत. मात्र, त्यांचे साहित्य या खोल्यांमध्ये आहे. जिल्हा प्रशासनाला वसतिगृहे उपलब्ध करुन देण्यासाठी तेथून संबंधित साहित्य स्थलांतरीत केले जाणार आहे.

# विद्यापीठ कक्षात २८ संशयितांवर उपचार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या मुलांच्या वसतिगृहात सुरू केलेल्या करोना आयसोलेशन कक्षात दाखल करण्यात आलेल्या २८ संशयित रुग्णांवर बुधवारपासून उपचार सुरू झाले. यासाठी डॉक्टरांचे विशेष पथक नेमण्यात आले आहे. सर्व त्या मूलभूत सुविधा विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने पुरवण्यात आल्या आहेत.

करोनाचे रुग्ण वाढल्यास शहर व उपनगर परिसरातील रिकाम्या इमारती आयसोलेशन कक्ष म्हणून रूपांतरीत करण्याची प्रक्रिया जिल्हा प्रशासनाने एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू केली होती. या अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील मुलांच्या वसतिगृहात एक हजार बेडची सुविधा असलेल्या आयसोलेशन कक्षाची तयारी ठेवण्याचा प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाला दिला होता. यानुसार येथील १२ विद्यार्थ्यांच्या साहित्याचे स्थलांतर करून या वसतिगृहातील खोल्या करोना संशयित रुग्णांसाठी उपलब्ध करून दिल्या होत्या. मंगळवारी रात्री उशीरा या कक्षात २८ रुग्णांना ठेवण्यात आले. पुढील १४ दिवस या रुग्णांवर उपचार केले जाणार आहेत.

## आमचा आवाज

# इंधन दरातील कपातीने बाजारपेठेला गती मिळेल

तेलाचे दर घसरल्यामुळे आस महागाई कमी होण्याची, अर्थव्यवस्था सुधारण्याची करोनाच्या संकटामुळे व्यापार, व्यवसाय, वाहतूक अशा सर्वच इंडस्ट्रीज जागेवर खिळल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचा दर घसरल्यामुळे भविष्यात पेट्रोल, डिझेलचे दर कमी होऊन सगळ्यांना दिलासा मिळायला हवा. इंधनाच्या दरात घसरण झाली की वाहतूक व्यवस्था स्वस्त होऊन महागाई कमी व्हावी, अशा अपेक्षा नागरिकांच्या भावना आहेत. भविष्यात अर्थव्यवस्थेला फायदा होऊन बाजारपेठेला गती मिळेल, असा आशावाद नागरिकांना आहे.

## अर्थव्यवस्थेला लाभ होऊ शकतो

कच्च्या तेलाच्या किंमतीत घट झाल्यामुळे त्याचा फायदा निश्चितच भारतीय अर्थव्यवस्थेला होऊ शकतो. भारताची चालू खात्यातील तूट कमी



होण्यास मदत होईल.त्याचप्रमाणे देशीय बाजारपेठेतील भाववाढीच्या दरात घट होऊ शकते. तेलाच्या घसरलेल्या किंमतीमुळे झालेल्या बचतीचा उपयोग करोना महामारीमुळे उद्‌भवलेल्या संकटावर मात करण्यासाठी व आरोग्य यंत्रणेवर खर्च करण्यास मदत होईल.

प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, शिवाजी विद्यापीठ